# राष्ट्रीय प्रदर्शनात झळकणार निलेश शिळकर, अविनाश मोरे यांची चित्रे

**देवरूख (प्रतिनिधी) :** बॉम्बे आर्ट सोसायटीतर्फे भरविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय चित्रप्रदर्शनात रत्नागिरी शीळ येथील निलेश शिळकर व संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील अविनाश मोहिरे यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रांची निवड झाली आहे. या सोसायटीमध्ये १७ ते २३ जानेवारी २०११ या कालावधीत प्रदर्शन भरविले जाणार आहे. या प्रदर्शनाला '११९ वे ऑल इंडिया ॲन्युयल आर्ट एक्झीबिशन २०११' असे नाव दिले आहे.

या संस्थेची स्थापना १८८८ साली झाली आहे. नवीन वर्षातील प्रदर्शनासाठी सुमारे ५ हजार चित्रकारांकडून चित्रकृती पाठविण्यात आली होती. यातील सोसायटीतर्फे ५० चित्रांची प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. यामध्ये शिळकर व मोहिरे यांच्या चित्रांचा समावेश आहे. शिळकर याने नेहमीच्या अंधासाठी असलेल्या ब्रेल लिपीचे माध्यम घेऊन चित्राकृती साकारली आहे. यातील एका चित्राची पसंती सोसायटीने केली आहे.

आभास आणि वास्तव या परस्पर विरोधी संकल्पना असतानाही त्या परस्पर पूरकही आहेत. वास्तवाला एक ठोस अस्तित्व असते. आभास अल्पजीवी, सतत परिवर्तनीय असतात. पण हे आभासच अनंत अस्तित्वाचे अनेक पैलू असतात. अशाच प्रकारे 'ॲक्रॅलिक' माध्यमातून तर मोहिरे यांनी चित्रकृती रेखाटली आहे. या सोसायटीच्या प्रदर्शनात रत्नागिरी शीळ, साडवली अशा ग्रामीण भागातील चित्रकार शिळकर व मोहिरे यांच्या चित्रांना पसंती मिळणे महनीय आहे. म्हणूनच या चित्रकारांचे येथील रसिकांकडून विशेष कौतुक होत आहे.





अविनाश मोहिरे



निलेश शिळकर

